## MAHARASHTRA ACT No IX OF 1995

## THE MAHARASHTRA RAW COTTON (PROCUREMENT, PROCESSING AND MARKETING) (RETROSPECTIVE EXTENSION OF DURATION) ACT, 1995.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राष्ट्रपती यांची संमती दिनांक २९ एप्रिल १९९५ रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**प्रतिमा उमरजी,**
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No IX OF 1995

## AN ACT TO EXTEND THE DURATION OF THE MAHARASHTRA RAW COTTON (PROCUREMENT, PROCESSING AND MARKETING) ACT, 1971, WITH RETROSPECTIVE EFFECT.

[राष्ट्रपती यांची संमती मिळाल्यानंतर महाराष्ट्र शासन राजपत्रात दिनांक २ मे १९९५ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला]

सन १९९५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९.

**महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) अधिनियम, १९७१ याची मुदत भूतलक्षी प्रभावाने वाढवण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते;

१९७१ चा महा. ४७. **आणि ज्याअर्थी,** यात यापुढ दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) अधिनियम, १९७१ याची मुदत भूतलक्षी प्रभावाने वाढवण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तावडतोब कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल महाराष्ट्राच्या राज्यपालांची खात्री पटली होती; आणि म्हणून, त्यांनी दिनांक १८ जानेवारी १९९५ रोजी महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्राएण, संस्करण व पणन) (भूतलक्षी प्रभावाने मुदत वाढवणे) अध्यादेश, १९९५ हा प्रख्यापित केला होता; [१९९५ चा महा. अध्या. २.]

आणि ज्याअर्थी, उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या सेहेचाळिसाव्या वर्षी, याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ. १. (१) या अधिनियमास महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) (भूतलक्षी प्रभावाने मुदत वाढवणे) अधिनियम, १९९५ असे म्हणावे.

(२) तो, दिनांक ३० जून १९९४ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७ याच्या कलम १ ची सुधारणा. २. महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) अधिनियम, १९७१ (यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा केला आहे) याचे कलम १, पोट-कलम (४) मध्ये "१९९४" या आकड्याऐवजी "१९९५" हा आकडा दाखल करण्यात येईल. १९७१ चा महा. ४७.

व्यावृत्ती. ३. कोणत्याही व्यक्तीने, १ जुलै १९९४ रोजी सुरू होणाऱ्या आणि १७ जानेवारी १९९५ रोजी समाप्त होणाऱ्या कालावधीत केलेली किंवा करण्याचे वर्जिलेली कोणतीही कृती ही, या अधिनियमाद्वारे मुख्य अधिनियमाच्या मुदतीत भूतलक्षी प्रभावाने वाढ करण्यात आली नसती तर, अपराध ठरली नसती तर, त्या बाबतीत ती व्यक्ती, या अधिनियमातील कोणत्याही गोष्टीमुळे अशा कृतीच्या किंवा अकृतीच्या संबंधातील कोणत्याही अपराधाबद्दल दोषी ठरवली जाण्यास पात्र असणार नाही.

शंका दूर करणे. ४. शंका दूर करण्याकरिता, याद्वारे असे घोषित करण्यात येते की, दिनांक ३० जून १९९४ नंतर समाप्त होणाऱ्या मुख्य अधिनियमाची मुदत या अधिनियमाद्वारे, त्या दिनांकापासून ३० जून १९९५ हा दिनांक धरून त्या दिनांकापर्यंत भूतलक्षी प्रभावाने वाढवण्यात आल्यामुळे तो कोणत्याही वेळी समाप्त झालेला नव्हता असे मानण्यात येईल व या अधिनियमाद्वारे, सुधारण्यात व मुदत वाढवण्यात आल्याप्रमाणे असलेल्या, त्या अधिनियमाच्या सर्व तरतुदी या अधिनियमाच्या कलम ३ च्या तरतुदींच्या अधीनतेने अखंडपणे अंमलात असल्याचे मानण्यात येईल.

सन १९९५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ याचे निरसन व व्यावृत्ती. ५. (१) महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) (भूतलक्षी प्रभावाने मुदत वाढवणे अध्यादेश, १९९५ हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे. १९९५ चा महा.अध्या.२.

(२) अशा प्रकारे निरसन झाले असले तरीही, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमान्वये करण्यात आलेली कोणतीही गोष्ट किंवा कार्यवाही (केलेली कोणतीही नियुक्ती किंवा केलेला कोणताही नियम, काढलेला आदेश किंवा अधिसूचना यांसह) ही, या अधिनियमाद्वारे सुधारण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या तत्सम तरतुदींअन्वये करण्यात आलेली गोष्ट, कार्यवाही, नियुक्ती, नियम, काढलेला आदेश किंवा, यथास्थिति, काढलेली अधिसूचना असल्याचे मानण्यात येईल.

(यथार्थ अनुवाद),

(प ग पाटील)

भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य